UGC

01

SCHOLARLY RESEARCH JOURNAL'S

# CERTIFICATE

of Contribution Awarded to

डॉ . प्रा . दीपक गायकवाड

Has successfully contributed and published a paper

आमच्या आयुष्यातील काही आठवणीः एक आकलन

In an

International Peer Reviewed & Referred

## Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies

E- ISSN 2278 - 8808& P-ISSN 2319-4766, SJIF 2016:6.177

UGC APPROVED SR. NO. 49366

NOV-DEC, 2017 Volume 4, Issue 37, Released On 04/01/2018

SRJIS

Certificate No. SRJIS 35/35/2018

www.srjis.com

Dr. Yashpal D. Netragaonkar

Editor-In-Chief for SR Journals

Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,
Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com
UGC Approved Sr. No.49366, NOV-DEC 2017, VOL- 4/37

# आमच्या आयुष्यातील काही आठवणी : एक आकलन

प्रा. दीपक गायकवाड, M.A., Ph.D.
*श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पर्वती, पुणे*

**Abstract**

*आज आत्मचरित्र हा वाङ्‌मय प्रकार समृद्ध झाला आहे. स्त्री आणि पुरुषांनी आपले अनुभव वास्तवपणे मांडले आहेत. पण आपल्या भारतीय संस्कृतीचा इतिहास पाहिला तर स्त्रीयांना प्रत्येक ठिकाणी दुय्यम स्थान दिले आहे. मराठीत स्त्रीलिखित आत्मचरित्रांचा स्त्रीवादी प्रवास १९७५ पासून सुरु झालेला दिसतो. एकूणच स्त्रीयांच्या आत्मकथनातून स्त्रीच्या जीवनाची झालेली हेळसांड दिसते. रमाबाईचीही आयुष्यभर हेळसांड झालेली दिसते, पण यावर मात करुन त्या पुढे जात राहिल्या. मुळात स्त्री आणि पुरुषांसाठी समान मुल्ये आहेत की नाही असा प्रश्न उभा राहतो. रमाबाई रानडे यांनी १९१० साली लिहिलेले मआमच्या आयुष्यातील काही आठवणीफ हे मराठीतील पहिले स्त्रीलिखित आत्मचरित्र होय. हिंदी लेखिका जानकीदेवी बजाज यांनी रमाबाईचे आत्मचरित्र वाचल्यामुळे त्यांना आत्मचरित्र लेखनाची प्रेरणा मिळाली. म्हणून या रमाबाईच्या आत्मचरित्राला मराठी आत्मचरित्र परंपरेत मोलाचे स्थान आहे. त्याचा आढावा या शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी चरित्रात्मक संशोधन पद्धती वापरली आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रास्ताविक :**

मराठीमध्ये स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांचे दालन समृद्ध आहे. डॉ. भालचंद्र फडके यांनी म्हटल्याप्रमाणे झमराठीत जी आत्मचरित्रे लिहिली गेली त्यातील चांगली आत्मचरित्रे स्त्रियांनीच अधिक लिहिली आहेत.ङ हे त्यांचे म्हणणे बरोबर वाटते. अलीकडच्या कालखंडामध्ये विविध क्षेत्रांतील स्त्रियांनी आत्मपर लेखन केले आहे. पण ग्रामीण भागातील स्त्रियांची आत्मचरित्रे अजूनही मराठीमध्ये लिहिली गेली नाहीत हे नमूद करावेसे वाटते. स्त्रियांची आत्मचरित्रपर लेखनाची परंपरा ही आपल्याला सहाव्या व सातव्या शतकातील ओवी, म्हणी, गाणी, उखाणे यांसारख्या स्त्री–वाङ्मयातील आत्मविष्कारावरुन जाणवते. त्यानंतर मध्ययुगीन मराठी साहित्यामध्ये काही संत कवयित्रींच्या अभंगांमध्ये आत्मचरित्रात्मक लेखन झालेले आहे. यामध्ये पहिले स्थान संत नामदेवांची दासी नागरी आणि जनाबाई. उत्तर पेशवाईतील प्रख्यात साधू चिदंबर दीक्षित, गर्लहोसूकर यांची भक्त विठाबाई. तुकारामांची शिष्या बहिणाबाई इत्यादी संत कवयित्रींचा समावेश होतो. यांसारख्या स्त्री वाङ्‌मयातील आत्मविष्कारातून ती अंशिक आत्मचरित्र आहेत असे म्हणता येईल. पण आत्मचरित्र म्हणता येणार नाही. आतमचरित्र या वाङ्‌मय प्रकाराचे निकषही लावता येणार नाहीत. फक्त या वाङ्‌मय प्रकाराची काही पाळेमुळे आपल्याला तेथे शोधता येतात.

**पहिले मराठी स्त्री आत्मचरित्र :**

मराठीमध्ये आत्मचरित्र या वाङ्‌मयात स्त्रियांना उशिरा का होईना प्रवेश मिळाला. म्हणजे विसाव्या शतकातील पहिली आत्मचरित्रपर लेखनाकृती ही एका स्त्रीची म्हणजे रमाबाई रानडे यांची आहे. मराठीतील पहिल्या स्त्री आत्मचरित्रकाराचा मान मआमच्या आयुष्यातील काही आठवणीफया रमाबाई रानडे यांच्या आत्मचरित्राला जातो.

मआमच्या आयुष्यातील काही आठवणीफया रमाबाई रानडे यांचे १९१० मध्ये प्रसिद्ध झालेले आत्मचरित्र होय. रमाबाई रानडे यांनी या आपल्या आत्मचरिंत्रामधून आपल्या पतीचे म्हणजे न्या. रानडे यांचे चरित्र रेखाटले आहे. न्या. महादेव गोविंद रानडे यांना १९ व्या शतकात अनन्यसाधारण महत्त्व आहे. न्या. रानडे यांचा समाजकारणातील दबदबा पाहून रमाबाईंना त्यांचा आदर वाटणे साहजिकच होते.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

१९०१ मध्ये न्या. रानडे यांचे निधन झाले. हे पतिवियोगाने दुःख सुसह्य करण्यासाठी कालांतराने म्हणजे नऊ वर्षानी रमाबाईंनी हा ग्रंथ लिहिला.

**बालपण:**

रमाबाईंचा जन्म १९६२ मध्ये सातारा जिल्ह्यात देवराष्ट्र गावी. कुर्लेकर सरदार घराण्यात झाला. त्यांची आई मिरज येथील राघोपंतभाऊ करमकर. प्रसिद्ध राजवैद्य यांची कन्या होय. त्यांच्या आईचा स्वभाव मायाळू, सोशीक, भिडस्त तर वडील तापट व करारी स्वभावाचे होते. घरातील संस्कारक्षम वातावरणामुळे त्यांच्या आईवडिलांकडून रमाबाईंना एक चांगला वारसा मिळालेला दिसतो. येथे एक प्रसंग सांगावासा वाटतो की, त्यांच्या वडिलांनी रमाबाईंना प्रथम सासरी जाताना जो उपदेश केला तो असा, ङ्गतुला कितीही त्रास झाला तरी सोस, पण नोकरांना उलटून बोलू नको. हे एक व दुसरे तुझ्या मनाला असह्य झाले तरी तू होऊन कोणाचीच चहाडी नवऱ्याजवळ सांगत जाऊ नकोस. चहाडीने कुटुंबाचा नव्हे तर राज्याचाही नाश होतो.ङ्ग आज इतक्या वर्षानंतरही रमाबाईंच्या वडिलांचे हे शब्द तितकेच महत्त्वाचे वाटतात.

रमाबाईचा विवाह ११ व्या वर्षी म्हणजे सन १९७३ सालच्या डिसेंबरत मार्गशीर्ष शुद्ध ११ शके १७९५ दिवशी गोरज मुहूर्तावर झाला. त्यावेळी रमाबाईंच्या पतीचे वय हे त्यांच्यापेक्षा २१ वर्षांनी जास्त होते. याशिवाय न्या. रानडे विधुर असूनदेखील रमाबाईंच्या वडिलांनी रमाबाईंना न्या. रानडे यांना देऊ केले. यावरुन असे लक्षात येते की, न्यायमूर्तींचे चांगले घराणे, न्यायमूर्तींची विद्वता व हुद्दा या गोष्टींना प्राधान्य देऊनच रमाबाईंच्या वडिलांनी हा विवाह ठरवला होता. लग्नाच्या वेळी रमाबाईंचे शिक्षण अक्षरओळख होण्यापर्यंत देखील झाले नव्हते. या कारण रमाबाईंच्या घरात स्त्रियांच्या शिक्षणाविषयी विरोध असलेला दिसतो. याविषयी रमाबाई म्हणतात, ङ्गमाझे वडील, आत्या स्तोत्रे वगैरे वाचावयास शिकली होती. तिला पुढे दुर्दैवाने वैधव्य आल्यापासून आमच्या वडील चुलत्यांनी ठरविले की, आमच्या घरात बायकांनी लिहिणे, वाचणे, शिकणे धार्जिणे नाही असे ऐकल्यवार नुसता लिहिण्या-वाचण्याचा विचारही मनात आणला तर पाप लागेल की काय, अशी बायकांची समजूत होण्यास काय उशीर! त्यामुळे आम्हा मुलींना लिहिण्यावाचण्याचा गंधही नसणे स्वाभिविकच आहे.ङ्ग पण लग्नानंतर पतीकडून त्यांना शिक्षण मिळाले. पतीच्या प्रेरणा आणि पाठिंबा यामुळेच रमाबाई शिक्षण घेऊ शकल्या. न्या. रानडे देखील रमाबाईंच्या शिक्षणाबाबत दक्ष असलेले दिसतात. रमाबाईकडून अभ्यास करुन घेण्यासाठी मफिमेल ट्रेनिंग कॉलेजफ मधील एक मास्तरीण न्या. रानडे यांनी नेमली. परंतु रमाबाईचा हुडपणा पाहून ती मास्तरीण निघून गेली. तेव्हापासून न्या. रानडे यांनी स्वतः रमाबाईचा अभ्यास घ्यायला सुरुवात केली. बालपणापासून शिक्षणाची सवय नसल्यामुळे विद्येची गोडी निर्माण होण्यास रमाबाईंना थोडासा उशीर लागला. पण पुढे मात्र आपले दीर इंग्रजी शिकताहेत हे पाहून आपणही इंग्रजी शिकावे असे रमाबाईंना वाटू लागले. त्या आपल्या आठवणीत सांगतात, ङ्गयाबद्दल एके दिवशी मी जवळ हळूच गोष्ट काढली. मी होऊन इंग्रजी शिकण्याबद्दल गोष्ट काढलेली पाहून, स्वतःस बरेच नवल, पण समाधानही वाटले.ङ्ग अशाप्रकारे रमाबाईंनी स्वतःहून आपल्या शिक्षणाचा पाया मजबूत करण्यास सुरुवात केली.

**रमाबाईंचे शिक्षण:**

स्त्री शिक्षणाच्या मर्यादा ओलांडून रमाबाईनी शिक्षण घेणे हे घरातील इतर स्त्रियांना मात्र आवडले नाही. स्त्रियांनी शिकावे फक्त वाचण्यापुरते व हिशेबापुरते ही त्यांची समजूत पण रमाबाईंनी क्रमिक पुस्तकांचा अभ्यास करणे. इंग्रजी शिकणे ही गोष्ट घरातील स्त्रियांना आवडली नाही. त्यांच्याकडूनही रमाबाईंच्या शिक्षण घेण्याला खूप विरोध झाला. याचे प्रत्यंतर म्हणजे रमाबाईंशी अबोला धरणे, टोमणे मारणे, टाकून बोलणे यांसारखे प्रकार सुरु झाले. यांसारख्या प्रकारांमुळे रमाबाईंना खूप मानसिक त्रास सहन करावा लागला. न्या. रानडे दिवसा रमाबाईंना अभ्यास करणे शक्य नसल्यामुळे रात्री आपल्या खोलीत वर माडीवर शिकवत असत. रात्रीसुद्धा रमाबाई खाली बायकांना आपलं वाचणं ऐकू जाऊ नये म्हणून हळू आवाजातच वाचत असत. परंतु न्या. रानड्यांना हे आवडत नसे. त्यामुळे रमाबाईंना मोठ्याने वाचावे लागे. सकाळी रानडे कामावर गेले की, घरातील इतर बायका मुद्दाम रमाबाईदेखत रमाबाईनी रात्री वाचलेली कविता हेल काढून

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

वेड्या वाकड्या आवाजात एकमेकींना म्हणून दाखवून रमाबाईंना चिडवत असत. रमाबाईंचे हे शिक्षण त्यांना आवडत नसे. त्या येता जाता घालून पाडून बोलून रमाबाईंना टोमणे मारत, म्हणत, ड्ढतू माडीवर काय हवे तर कर, पण आमची अमर्यादा केलेली आम्हाला अगदी खपायची नाही.ड्ड शिक्षणावरुन त्यांना या प्रकारची खूप बोलणी खावी लागली. याचसंदर्भात रमाबाई एक प्रसंगी आपल्या आठवणीत सांगतात, ड्ढदुपारचे जेवण झाल्यवार सगळ्या बायका मागल्या सोप्यात बसल्या होत्या. मी माजघरातील केर काढीत होते. केरात इंग्रजी वर्तमानपत्राचा एक कपटा सापडला. आधीच माझा पोरपणा, उतावीळपणे मी घरातील केरसुणी खाली ठेवून तो कपटा वाचीत उभी राहिले. पंधरा दिवसात काय येणार होते? मी नुसती अक्षरे पाहत उभी होती. त्यावेळी आजेसासूबाईंनी नजर माझ्याकडे गेली. त्यांनी जवळच्या बायकांना खूण केली. ते पाहून वन्संना फारच राग आला. त्या मोठ्याने ओरडून म्हणाल्या, ड्ढतुमचे हापीस माडीवर आहे. तेथे वाचा की नाचा! आमचा अपमान केला तर खबरदार!ड्ड घरातील बायकांनी रमाबाईंच्या शिक्षणाला एवढा विरोध का केला असावा? एक तर शिक्षणाने ह्या नव्या मुली उद्धट होतील, अशी त्यांची समजूत असावी. नाही तर आपल्याला शिक्षण घेणे जमले नाही, मिळाले नाही, ते हिला मिळत आहे अशी न्यूनगंडाची भावना त्यांच्या मनात असावी असे वाटते. पण रमाबाई मोठ्या धीराच्या, जिद्दीच्या, दृढ निश्चयाच्या. त्यांनी अशा बोलण्यामुळे कधीही हार मानली नाही. उत्तम इंग्रजी शिकल्या. आयुष्यभर स्त्रियांच्या सुधारणांसाठी धडपड केली. आजच्या मुलींना हे प्रसंग अनुभव काल्पनिक वाटतील; पण ते खरे आहेत. काळाच्या मर्यादा ओलांडून आजही मुलींना आणि स्त्रियांना आदर्श ठरावेत. त्यातून काहीतरी बोध होईल असे आहेत.

पंडिता रमाबाई ज्यावेळेस पुण्यात आल्या. त्यावेळेस स्त्रियांच्या हक्कांच्या विचारांचा प्रसार त्यांनी आपल्या सभांमधून केला. रमाबाईंनी या सभांना जाऊ नये. पंडिता रमाबाई घरी आल्यावर त्यांना शिवू नये. पुरुषांना या गोष्टी हव्या असल्या तरी आपण दुर्लक्ष करावे, नाही म्हणू नये असे वन्संनी व रमाबाईच्या सासुबाईंनी त्यांना शिकवण्याचा प्रयत्न केला. परंतु दुसऱ्याला कोणालाही वाईट न बोलता स्वतःला हवी असेल तीच गोष्ट करण्यास रमाबाई कधीही चुकत नसत. हा त्यांचा स्वभवाधर्म होता. घरातील अशा स्त्रियांच्या वागण्यामुळे व स्वतःच्या वर्तनामुळे त्या म्हणतात, ड्ढआठ महिन्यांचा उन्हाळा व एक दिवसाचा पावसाळाड्ड अशी घरातील इतर आप्तांची व स्वतःची वागणूक असे. घरच्या बायकांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करुन रमाबाई पं. रमाबाईच्या सभांना जातच राहिल्या. रमाबाई सभा संपल्यानंतर घरता परत आल्यावर ताईसासूबाई व वन्स रमाबाईंना रागवत असत. त्याबाबत रमाबाई आठवण सांगतात, ड्ढघरी परत आल्यावर सभेतील आनंद व तो धीटपणा मावळून जाऊन मी भेदरल्यासारखे माजघरात उभे रहावयाचे. मला कडक ताकीद व्हयाची, तुम्ही सभेला जाऊन आलात आहात तुमचे लुगडे बाटले आहे. लुगडे बदलले तरीसुद्धा आमच्या घरात जेवन वाढायला घ्यायचे नाही.ड्ड घरातील बायकांच्या अशा वागण्यामुळे रमाबाई कधीही त्यांना उलटून बोलल्या नाहीत. फार झाले तर रडून मनाला झालेला असह्य भार हलका करत असत. येथे रमाबाईंना होणारा मानसिक त्रास दिसून येतो. रमाबाईचा हा संघर्ष बाह्य नसून आंतरिक आहे हे समजते. महाराष्ट्रात त्यावेळी स्त्रियांच्या शिक्षणाबाबत जागृती झाली नव्हती. मुलींनी शिकणं म्हणजे पाप करणं अशीच त्याकाळची समजूत होती. अशा वातावरणात न्या. रानडे यांनी आपल्या पत्नीला शिकवले. यापेक्षाही घरातील खाष्ट स्त्रियांचा सासू-नणंद यांचा जाच सहन करुन रमाबाई कशा शिकल्या असतील हे खरंच त्यांच्या आठवणींमधून स्त्री शिक्षणाविषयी बोध घेण्यासारखे आहे.

**न्या. रानडे यांची सहवास:**

न्या. रानडे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा फार मोठा प्रभाव रमाबाईवर पडलेला दिसतो. पं. रमाबाई यांचा सहवास व न्या. रानडे यांचे विचार यातून रमाबाईची जडणघडण झालेली दिसते. न्या. रानडेंविषयी रमाबाईच्या मनात एक आदराचे स्थान होते. न्या. रानडे यांच्याबरोबर वेगवेगळ्या कारणांमुळे रमाबाईंनी भारतभर भ्रमंती केली होती. त्याची सविस्तर माहिती त्यांनी आपल्या आठवणींमध्ये नोंदवली आहे. प्रवासातल्या गमतीजमती, वेगवेगळे अनुभव सांगत असताना एक मसहचरीफम्हणून न्या. रानडे यांच्याशी अधून मधून चर्चा करताना रमाबाई दिसत असल्या, तरी आपण एक गृहिणीपदाची स्वीकारलेली भूमिका व मर्यादा कधीच सोडताना दिसत नाहीत. याच

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

प्रगतीमध्ये न्या. रानडे यांना दोन वेळेस भयंकर आजाराने पिडले. १८९१ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील करमाळा व १८९३ मध्ये सोलापूर येथेच फिरतीवर असताना ते आजारी पडले. पण दोन्ही वेळेस रमाबाईंनी अतिशय धीराने व प्रसंगावधानाने त्यांची सेवा केलेली दिसते. यातून रमाबाईंचे पतिप्रेमही प्रकटते.

न्या. रानडे यांनाही आपल्या कुटुंबाबद्दल व पत्नीबद्दल असलेले प्रेम येथे दिसून येते. पाच हौद मिशनमधील चहा प्रकरणाच्या वेळी आपल्या कुटुंबियांना त्रास होऊ नये याची काळजी त्यांनी घेतली होती. त्याचबरोबर घरातील व्यक्तींना त्यांनी कधीही असंतुष्ट केले नाही. आपली प्रिय पत्नी रमाबाई यांच्याशी तर दररोज जेवण झाल्यवार पंधरा मिनिटे बोलत असत. रमाबाई दुःखी असताना त्यांना आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करत. ऑपरेशनच्या वेळी तर न्या. रानडे यांनी रमाबाईंची एवढी काळजी घेतली की तासन्‌तास ते रमाबाईंच्या शेजारी शांतपणे बसत. त्यावेळी न्या. रानडे यांची झालेली घालमेल सांगताना रमाबाई आपल्या आठवणीत लिहितात. ‡प्रत्येक वाक्य बोलताना स्वतःच्या मनाची स्थिती कशी झाली होती ती हुबेहुब माझ्या डोळ्यांसमोर असल्याने माझ्या अंतःकरणात कसेसच होऊन डोळे पाण्याने भरुन आले.‡ न्या. रानडे यांना ऑपरेशनमधून रमाबाई बऱ्या होतील की नाही याची भीती वाटत असावी असे वाटते. पण रमाबाईंनी स्वतःहून ऑपरेशन करण्याची भूमिका स्वीकारलेली दिसते. शेवटी रमाबाईंचे ऑपरेशन सुखरुपपणे पार पडते. पण थोड्याच दिवसांत न्या. रानडे यांची तब्येत खालावते आणि १९०१ मध्ये न्यायमूर्तींचे देहावसन होते.

समारोप:

मराठी वाङ्‌मयामध्ये बऱ्याच लेखकांनी या आत्मचरित्राचा उल्लेख पतिचरित्र म्हणून केला आहे. पण परिस्थितीला अनुसरुन रमाबाईंचे लेखन झालेले दिसते. पुरुषप्रधान संस्कृती असलेल्या या समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान असल्यामुळे रमाबाईंनी आपल्या पतीविषयी जास्त लिहिणे स्वाभाविकच आहे. त्याचबरोबर याला कारण न्यायमूर्तींचे व्यक्तिमत्त्वही होते. न्यायमूर्तींकडूनच रमाबाईंना नवीन विचारांचा वारसा मिळालेला दिसतो. त्यांची जडणघडणही त्यांच्यामुळेच झालेली लक्षात येते. केवळ पुस्तकी शिक्षण न देता, सभेमध्ये बोलण्यापासून, सामाजिक व व्यावहारिक शिक्षण रमाबाईंना न्यायमूर्तींनी दिले. रमाबाईंनी पतीच्या मृत्यूनंतरही अनेक संस्था समर्थपणे सांभाळल्या. सार्वजनिक जीवनात महत्त्वाचे योगदान दिले. याची पूर्वपरंपरा म्हणून न्या. रानडे यांचाच उल्लेख करावा लागेल.

रमाबाई रानडे यांच्या या आत्मचरित्राचा गोपाळ कृष्ण गोखले या एका थोर समाजसेवकाची प्रस्तावना लाभली आहे. त्यांनी हे पुस्तक लिहिण्यामागचा हेतू सांगून स्त्री-पुरुष समानतेकडे कसे पाहावे याचा उल्लेख केला आहे. त्याचबरोबर ते म्हणतात, ‡पत्नीने आपल्या पतीबद्दल अशा तऱ्हेने लिहिलेला हा हिंदुस्थानातील पहिलाच ग्रंथ हिंदुस्थानात आहे असे वाटते.‡ हेच या आत्मचरित्राचे यश म्हणावे लागेल. या आत्मचरित्राचा गौरव मराठीतील समीक्षक, वाङ्‌मय इतिहासकार, विविध नियतकालिके अशा सर्वांनीच केला. विसाव्या शतकात एका स्त्रीने लिहिलेली पहिल एक आत्मचरित्रपर लेखनकृती म्हणून आपल्याला या आत्मचरित्राकडे पाहता येते. आज मराठीमध्ये विविध क्षेत्रांतील स्त्रियांची आत्मचरित्रे प्रसिद्ध होत आहेत; पण याचा पाया घालण्याचे काम रमाबाईंनीच केले हे आवर्जुन नमुद करावेसे वाटते.

संदर्भ :

*आमच्या आयुष्यातील काही आठवणी- रमाबाई रानडे, १९१०*

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies